
एकलव्य का प्रकाशन

# रूसी आणि पूसी

एक चित्रकथा

वी. सुतेयेव



# रूसी आणि पूसी

## एक चित्रकथा

चित्र आणि कहानी
वी. सुतेयेव



एकलव्य का प्रकाशन

**रुसी आणि पूसी**
एक चित्रकथा
चित्र आणि कहानी: वी. सुतेयेव
मराठी अनुवाद: सुधा हर्डीकर

स्टोरीज़ एण्ड पिक्चर्स ची एक चित्रकथा.
प्रगति प्रकाशन, मास्कोच्या सौजन्याने इंग्रजीतून आणि प्रकाशित.

मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत शासन आणि
सर रतन टाटा ट्रस्टच्या वित्तीय सहयोगानी प्रकाशित.

हे पुस्तक हिन्दी, बंग्ला आणि इंग्रजीत सुद्धा उपलब्ध आहे.

जानेवरी, 2002 / 3000 प्रति
ऑगस्ट, 2021 / 2000 प्रति
कागद: 100 gsm मेपलिथो 220 gsm पेपर बोर्ड (कवर)
मूल्य ₹ 45.00

प्रकाशक: एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
फॉर्च्यून कस्तूरी के पास, जाटखेड़ी,
भोपाल – 462 026 (मप्र)
फोन: +91 755 - 297 7770, 71, 72, 73
www.eklavya.in / books@eklavya.in


मुद्रक: बॉक्स कॉरोगेटर्स एंड ऑफसेट प्रिंटर्स, भोपाल,
फोन: +91 755 258 7551




# रुसी आणि पूसी



एक थी रुसी आणी एक होती पूसी. दोघींची होती गट्टी.





रुसी चित्र काढण्यात गुंग होती त्यात वेळी पूसी उडी मारून खुर्चीवर येऊन बसली.







“तू हे काय करीत आहेस.”
पूसीनं विचारलं.

“मी तुझ्या साठी सुंदरस घर
बनवीत आहे.” रुसी म्हणाली.
“हे पहा घराचे छप्पर, हा दरवाजा
आणि ही घूरासाठी चिमणी.”






“पण मी घरात जाऊन काय करीन?” पूसीनं विचारलं. “तू आपल्यासाठी चूल बनव आणि त्यावर स्वयंपाक कर.” रुसी म्हणाली आणि चित्रात चिमणीतून धूर निघताना दाखविला.




“पण.. पण.. खिडकी कुठे आहे ह्या घराला? मांजर तर खिडकीतूनच उडी मारुन घरात जाते न?” पूसीन थोडा आवाज चढवून म्हणाली. “ह्या पहा, एक.. दो.. तीन.. चार..” रुसीन चित्रात भराभर खिडक्या काढून दाखविल्या. “पण मला फिरायला जागा कुठे आहे?” पूसील लाडवत विचारलं.





“ही पहा!” अन रुसीन झटपट
घराच्या चारही बाजूला कुंपण
काढलं. आणि ती म्हणाली,
“आणि हा पहा बगीचा!”
पूसीन चित्रा कडे डोळे वटाकून
पाहिलं आणि म्हणाली।
“एवढासा बगीचा? आणि इथे
झाड-फुल सुद्धा नाहीत.”







“अग थांब, तिकी घाई करु नकोस.” रुसी म्हणाली. “ही पहा फुलझाड, हे पेरुचं झाड, ही गाजरं आणि ही फूलकोबी.”

“फूलकोबी....! पूसीन तोड वाकड करत विचारलं. आणि मी मासळया धरायला कुठे जाईन?”





"हे पहा इथं." अन रुसीन चित्रात एक छोट तळ
काढलं त्यांत तीन मासे पण होते.
पूसी खुश झाली. मासे पाहून
तिच्या तोंडला पाणी सुटलं.
वाह कित्ती छान...! पण
इथं पाखरं पडताना तर
दिसत नाहीयेत. मला
पाखरांची शिकार पण
आवडते. पूसी म्हणाली.



“अरे मी तर विसरलेच.” रुसी म्हणाली आणि तिने चित्रात कोंबडा, कोबडी त्याची तीन पिल्लं  आणि एक बदक सुद्धा बनवलं.

पूसीन आपले पंजे चाटले आणि डोळे मिचकावून मिश्कलपणे विचारलं, “ह्या घरात उंदीरमामा तर असेलच ना?”







आता मात्र रुसीचा पारा चढला. तिन दरडावून सांगितलं की या घरात उंदीर सापडणार नाहीत. “मग माझ्या घराचे रक्षण कोण करणार?” पूसीन आवाज चढवून विचारलं. रुसीन लवकर लवकर चित्रात काहीतरी बनवलं आणि म्हणाली, “हा पहा. हा कुत्रा तुझ्या घराचे रक्षण करेल.”

कुत्र्याचं नाव ऐकताच पूसी फणफणून उठली. तिन आपल्या पाठीची कमान केली, शेपटी उंचावली, मिशा विस्फरल्या, अणकूचीदार दांत दाखविले आणि पंजानं पाती उखरत म्हणाली. "मला नाही आवडलं तुझ हे घर, मी नाही रहणार या घरात."

पूसीचा जणू 'मूड ऑफ' झाला. ती रागावून तेथून निघून गेली. अता तुम्हीच सांगा कशी समजूत घालायची पूसीची?





parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS
एकलव्य
मूल्य: ₹ 45.00